## प्रकरण दुसरे

## " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीचे

## स्वरूप आणि मूल्यमापन

## प्रकरण दुसरे

## "उलट चालिला प्रवाहो" या कादंबरीचे स्वरूप आणि

## मूल्यमापन

### प्रस्तावना :

पहिल्या प्रकरणामध्ये कादंबरी या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप पाहत असताना आपण वेगवेगळया समीक्षकांनी कादंबरीविषयी केलेल्या व्याख्या, कादंबरीचे महत्त्वाचे घटक तसेच कादंबरीचा उदय कसा झाला याविषयी विचार केला. या प्रकरणामध्ये " उलट चालिला प्रवाहो" या कादंबरीचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे.

भारताला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले. त्याचा परिणाम संपूर्ण समाज जीवनावर झाला. १९५५ नंतर भारताच्या व महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय वातावरणात बदल घडून आले. याचवेळी निवडणुका झाल्या. १९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. यानंतर ग्रामीण व दलित साहित्याचे नवीन दालन उघडले गेले. तळागाळातील जनतेची दु:खे मांडण्यासाठी काही मंडळी पुढे आली. अशा अनेक लेखकांमध्ये डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा समावेश करावा लागतो. ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रणासंदर्भात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली आहे असे दिसून येते.

सामान्य मध्यमवर्गीयांची व ग्रामीण समाजाची सुखदुःखे, त्यांची स्वप्ने, आशा-आकांक्षा, संघर्ष, जातिभेद, राजकारण, निवडणुका यांचे प्रभावी चित्रण नागनाथ कोत्तापल्ले यांच्या साहित्य-कृतीतून आलेले दिसते. त्यांच्या काही कादंबऱ्या, कथासंग्रह व समीक्षा-लेखसंग्रह प्रसिध्द आहेत. त्यांची पहिली कथा " छेद " ही " प्रतिष्ठान" मधून प्रसिध्द झाली. अज्ञान, दारिद्र्य आणि दुःख यामुळे पांगळया बनत चाललेल्या मानवी मनाचे खरेखुरे चित्रण " कर्फ्यू आणि इतर कथा", " काफिला", " रक्त आणि पाऊस" या कथासंग्रहातील लेखनात दिसून येते. तसेच " त्रिज्या", " पापुद्रे ", " ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध" इत्यादी समीक्षालेखसंग्रह त्यांनी लिहिले आहेत. " मूडस" हा कवितासंग्रह त्यांनी लिहिला आहे. या खेरीज त्यांनी विपुल समीक्षा-लेख लिहिले असून ते वेळोवेळी अनेक नियतकालिकातून प्रसिध्द झालेले आहेत.

त्यांचे काही लेख दैनिक लोकमतच्या " अक्षररंग" या पुरवणीमध्ये " आजूबाजूला " या सदरामध्ये प्रसिध्द झालेले आहेत. त्यातील काही लेख पुढीलप्रमाणे : " प्रिय बाई", " कार्यकर्ता कसे व्हावे", "साहित्याची ऐशीतैशी", " बोरगाव महानगरीच्या कुशीत विसावतं तेव्हा ", 'मृत्युच्या प्रदेशात, " भारत देश मुद्दयांचा देश", " तीर्थक्षेत्राचे महातीर्थ" 'वेताळाने सांगितलेली गोष्ट' इत्यादी,

२० व्या शतकात भौतिक सुधारणा घडून आल्या. तरीही असंख्य लोकांना दोन वेळच्या भाकरीसाठी अतोनात कष्ट करावे लागतात. या दारिद्र्याच्या कचाटयात असंख्य माणसे कुटुंबे होरपळून निघत आहेत. साध्या स्वप्नांना सुध्दा या बहुजन व दलित समाजाला मुकावे लागते. कष्ट करून पोटाची खळगी कशी तरी भरून ते जीवन जगत असतात. "उलट चालिला प्रवाहो" या कादंबरीत याच उपेक्षित दुःखग्रस्त जीवनाचे चित्रण लेखकाने केले आहे. " उलट चालिला प्रवाहो" ही कादंबरी जानेवारी १९८५ ला प्रकाशित झाली. या कादंबरीचे तीन भाग आहेत. " कुठल्याही

प्रतिभानिर्मित साहित्यकृतीचा पाया वास्तवाच्या कठीण भूमितच खोदलेला आहे. तरीही दोन्हीची प्रत्यक्ष तुलना करायला येत नाही. कोणीही या कादंबरीत आपले रूप पाहू नये. कुठे कुणाला व्यक्ती आणि प्रसंगनिर्मित काही साम्य आढळले तर तो योगायोग समजावा" ही सूचना लेखकाने कादंबरीच्या सुरुवातीला केली आहे.

" उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीचे कथानक :
-----------------------------------------

घोडेगावातील भयानक दुष्काळाच्या पार्श्वभूमीवरील दलित आणि सवर्ण यांच्या संघर्षाचे चित्रण हा या कथानकाचा गाभा आहे. दलितांना कामे दिली जात नव्हती. धान्य दिले जात नव्हते. गावातील पाटील कुणाचे चालू देत नव्हता. पाटील गावातील लोकांना फसविणारा, सतत भांडणे लावणारा, कटकटी निर्माण व्हाव्यात म्हणून प्रयत्न करणारा व कपटी आहे. म्हणून स्वातंत्र्यसैनिक सदाशिवराव शिंदेयांनी घोडगावा-तील सर्व परिस्थिती सरकारला कळवली. पण सरकार काहीकरत नाही. हे सर्व कुठं तरी संपायला हवं असे नानासाहेबांना वाटले. म्हणून त्यांच्याच सेवाभावी संघटनेमध्ये काम करणा-या नारायणाला त्यांनी घोडेगावातील दलित सवर्ण संघर्ष मिटवण्यासाठी व परिस्थिती सुधारण्यासाठी पाठवलेले आहे.

सदाशिवराव व नानासाहेब यांच्यासारख्या स्वातंत्र्यसैनिकांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सर्व व्यवस्थित चालेल असे त्यांना वाटले. पण प्रतिष्ठित लोक होते तेच अप्रतिष्ठित ठरू लागले. गावात कोणी अधिकारी आला तर त्याला अंकित करून घेण्याचे काम पाटलांना चांगल्या प्रकारे येते. हे नारायणाला माहिती असल्यामुळे नारायण गढीवर रहायला न जाता शिवमंदिरात राहतो. नारायण गेल्यावर दोन -तीन दिवसांनी गावातील लोकांनी सर्व झोपड्या जाळल्या. या झोपड्या कशा जळल्या हे पहायला नारायण दलित

वस्तीत जातो. तेवढयात त्याला हरिभाऊ पगारे च्या अर्धवट जळलेल्या झोपडीत " इठू " रडत असलेला दिसतो. त्याची विचारपूस करून व पोटभर खायला घालून नारायणाने त्याला खडीकेंद्रावर नेले व गोजरबाईजवळ दिले. तिने नारायणाला सर्व परिस्थिती सांगितली. तिने, तिच्या नव-याने आणि तिच्या नातेवाईकांनी विरोधी पक्षाला मते दिली. त्यामुळे लोकांनी चिडून पगारेचे घर जाळलेले असते.

हे ऐकल्यावर नारायणाला वाटले, पाटलांशी बोलावं, विनवणी करावी, सांगावं कीगाव तुमचा. तुम्ही पाटील गावचे. आणि सरपंचही मी उपरा, परका, तुमच्या गावातला तिढा तुम्ही उकला. तुम्ही मिटवा. परंतु नारायणाला गढीबद्दल तिरस्कार वाटतो. म्हणून नारायण गढी-वरून मागे फिरतो. गढीवर घुबड आहे, ते बुजगावणं आहे असे त्याला वाटते . येथे नारायण कुलकर्णी कवठेकर यांची खालील कविता नागनाथ कोत्तापल्ले यांनी उद्धृत केली आहे,

" गढी आहे
गढीवर घुबड आहे
पण ते केवळ बुजगावणं आहे...
देवाच्या दयेनं गढी वाचण्यासाठी
सतराशे साठ पिढया जाव्या लागतील
गावात गढी असली म्हणजे
इतरांना कुणाच्या तरी पायाशी
आश्रितासारखे बसल्याची भावना होते.
गढी खालून कोरशील
हळूहळू लपत छपत
तर अंगावर अवचित कोसळून
सहका-यांसकट संपण्याची शक्यता
गढी एकदाच
उडवायची असेल धडाक्याने

तर थोडा धीर धर
नेमकेपणाने वार कर
पण कसेही करून गढी गेलीच पाहिजे ।
लोकांना पटवून दे
गढी कोसळण्याची आवश्यकता
आणि कारणे
अगदी....गढीच्या बुडात
लाख मोलाचा खजिना आहे
असे सांगितलेस तरी चालेल ।
गढी जाणे महत्त्वाचे ।"

गढी हे सरंजामशाहीचे प्रतीक आहे. नारायणला सरंजामशाही-विषयी चीड आहे. कारण सरंजामशाहीत एक सत्ताधीश असतो. बाकी त्याचे गुलाम आहेत. सत्तराशेसाठी पिढया गेल्या तरी गढी ढासळणार नाही. एवढी गढी भक्कम आहे. गढी कोसळायची असेल तर ती एकाटयाने पाडणे शक्य नाही. " गढीखाली लाख मोलाचा खजिना आहे असे खोटे सांगून लोकांना एकत्र आणले पाहिजे. म्हणजे गढी उद्ध्वस्त होईल. गढी किती दिवसापासून गावातील लोकांचे शोषण करत आहे. गढी कोसळली म्हणजे गावातील लोकांना आश्रितासारखे राहवे लागणार नाही. गढी कोसळली म्हणजे, गावातील संघर्ष, हेवेदावे थांबतील आणि गाव गुण्यागोविंदाने नांदेल असे नारायणला वाटते.

स्वातंत्र्यसैनिक सदाशिवराव शिंदयांच्या घरी गेल्यावर आपले या गावात कोणी तरी आहे या विचाराने नारायणला बरे वाटते. सदाशिवराव शिंदयाना लोक मारत आहेत हे पाहून त्यांची बायको सोडवायला गेली तर तिलाही लोकांनी मारले. ती कालपरवाची घटना नारायणाला सांगताना तिच्या डोळ्यातून अश्रू आले. ती नारायणला म्हणाली, " बघ बाळ, बघ, गाव भोवलं आम्हाला, आज ज्याचं चालतं, त्याचंच बघ, मग पडाच कशाला गावाच्या भानगडीत!नारायणने

शिंदयांसारखे साधे, सरळ स्वातंत्र्यसैनिक पाहिले नव्हते. शिंदे नारायणला सांगतात की इंग्रज सरकारच्या गोळया झेलून स्वातंत्र्य मिळवले. याचे गावातील लोकांना काही वाटले नाही. त्यांचा पांडोबा नारायणाचे जेवण घेऊन शिवमंदिरात जायचा. पण तो नारायण-बरोबर बोलत नाही. युवक कार्यकर्ता असून पत्ते खेळत बसण्याशिवाय तो काही करत नाही.

गावातील लोक बोलायला लागल्यानंतर नाराणाने लोकांना काही प्रश्न विचारले. सर्व लोकांच्याकडून एकच उत्तर आले. म्हणून नारायणाने कुंभाराला गावातील परिस्थिती विचारली. कुंभाराने त्याला सांगितले की दुष्काळामुळे माणसांच्या वाचाच हरवल्या आहेत. गावातील लोकांनी दलितांची घरे जाळली. काही लोक गाव सोडून जाताहेत. कुंभाराने सांगितलेले पटले नाही, म्हणून त्याने शाळेच्या लहान मुलांना गावातील परिस्थितीबद्दल विचारले. मुले शाळेत कविता म्हणावी तशी एका तालासुरात त्याला सांगू लागली,

" त्यांना नदीवर पाणी भरू दिलं जातं
दुकानावर सामान दिलं जातं,
गिरणीवर दळून दिलं जातं,
कुठंच काही आडकाठी नाही.
कुणीच त्यांना बोलत नाही.
बिडीच्या फुणगीने झोपडया-घरे पेटली असतील
अफवा आहेत. सा-या अफवा आहेत."

ही मुलांनी म्हणालेली कविता ऐकल्यावर नारायणाच्या डोळयासमोर तारे चमकू लागले. आपलेच काही चुकत असेल असेही नारायणला वाटले. दलित सवर्णांच्या संघर्षाने या कोवळया मुलांच्या मनावर परिणाम झाला आहे. समाज म्हणजे चक्रव्यूह आहे. चक्रव्यूहातील प्रत्येक वर्तुळे गुंतागुंतीची आहेत. या वर्तुळात सापडलेला नारायण व लहान राजकुमारांचा कुठवर

बळी जाणार आहे कोण जाणे ! या समाजाच्या चक्रव्यूहात सामान्य माणसाने शिरण्याचा प्रयत्न केला तर लोक त्याचाही बळी घेतात. मोजरबाईच्या निष्पाप मुलीला पळवून नेल्याची दवंडी कोणी दिली हे विचारण्यासाठी नारायण पांडू मांगाकडे गेला, परंतु पांडू काहीच सांगत नाही. तो चिलीम ओढत आरामात बसला आहे.

घोडेगावची वाट निष्पर्ण वठलेल्या झाडातून गेली आहे. रस्त्याने जनावरांच्या देहाचे सांगाडे पडले आहेत. चारा-पाणी-कडबा नाही. काही शेतक-यांनी गुरे सोडून दिली. काही वाळलेले गवत खात आहेत. काही खाटकाच्या घरी जात आहेत. ही परिस्थिती नारायणाला बिकट वाटते. घोडेगावातील लोक पोटाची वितभर खळगी भरण्यासाठी खडी-केंद्रावर यंत्रासारखे काम करीत होते. हे सर्व पाहून आल्यावर सर्व परिस्थिती तो नानासाहेबांना पत्राने कळवतो.

सरकारी सूत्रे हालू लागली. पत्रकार, वार्ताहर, समाजसेवक गावात येऊ लागले. सदाशिवराव शिंदयांना गावातील परिस्थिती सुधारायला लागली आहे याचे समाधान वाटले. पण अचानक आरडाओरडा ऐकू आला. नारायणाला स्वप्न पडले का भास आहे हेच कळले नाही. तो भास नव्हता तर झोपडया जळत होत्या. नारायणाला काळोखातील मिरवणुकीमध्ये कुंभार सूळ पेलत चालत असलेले दिसले, हे स्वप्न नसून प्रत्यक्षात घडले. गुण्यागोविंदाने नांदणारे गाव, झोपडया क्षणात उद्ध्वस्त झाल्या. याचदिवशी पांडू मांगाला व त्याच्याबरोबर दुस-या लोकांनाही धरून नेले. अस्पृश्यता निवारण समितीच्या लोकांनी सभा घेतली. पण त्यांचाही काही उपयोग झाला नाही.

भीषण दुष्काळामध्येच झोपडया जळाल्या. तरीही गावातील लोकांच्या डोक्यात प्रकाश पडला नाही. घोडेगावासारखे गाव नारायणाने कुठेच पाहिले नाही. शिरढोणकर मूळचा पुण्याचा. त्याच्याकडे संपत्ती भरपूर आहे. तरीही तो समाजातील लोकांकडून पैसे उकळतो. दलित लोक अन्नपाण्याविना बसले आहेत. जनावरांना चारा नाही

याची पर्वा न करता शिरढोणकर " स्ट्रगल फंड " जमवायला लागला आहे. शिरढोणकर व माने यांनी शासनाची मदत मिळ-वण्यासाठी झोपडया जाळल्या ती जागा तशीच दाखवायला ठेवून दुस-या ठिकाणी झोपडया उभ्या करून दिल्या. झोपडया पाहून नारायणला वाटले हे लोक हुशार आहेत. दलित वस्तीत रहाणा-या रामाने सर्वांना ओरडून सांगितले की झोपडया कशा जळल्या याचा सोक्ष-मोक्ष लागल्याशिवाय मी गप्प बसणार नाही.

वर्तमानपत्रात बातम्या छापून आल्या. ज्या लोकांना धरून नेले त्यांना सोडून दिले गेले. घोडेगावची परिस्थिती पहायला दोन सरकारी पोलिस ठेवले. गाव वरून शांत असले तरी आतून धुमसत असते. शिर-ढोणकर व माने बैठका घेऊन लोकांना आकर्षित करून घेतात. परंतु या दोघांचे आपली " इमेज " कशी वाटेल इकडेच लक्ष असते. हे पाहून नारायण ला वाटते मी येथे येऊन उपयोग तरी काय झाला ?

रावसाहेब माने महत्त्वाकांक्षी, मुत्सद्दी, बुध्दिमान आहे. त्याला सर्वसामान्य माणसांच्या भावनांना कसा हात घालावा हे चांग-ल्याप्रकारे कळालेले आहे. दुष्काळात बहुजन समाज भरडला जातो याचे त्याला काही वाटत नाही. वर्तमानपत्रात आपले नाव आलेकी त्याला समाजपरिवर्तन झाले आहे वाटते. असा हा माणूस सामाजिक लढे देणा-या संघटनेचा सेक्रेटरी आहे.

गावात दुष्काळ पडलेला असताना, गोजरबाई तसेच इतर स्त्रियां-कडे तो पैसे मागतो. पण त्याला मदत मिळत नाही. त्यामुळे वास्तविक माने चिडलेला असतो. तरीही दुष्काळग्रस्तांना मदत नाही केल्यास सचिवालयावर मोर्चा नेण्याची गोष्टी तो करतो. जातिविरहीत राजकारण आपण करतो अशा बुरख्याखाली तो वावरत असतो.

जळीत ग्रस्तांना शासनाने मदत मंजूर केली. ती मदत तहसीलदार घेऊन येणार आहे हे कळल्यावर शिरढोणकर खुश झाला. तो नारायणला म्हणाला, " नानासाहेब वाट पाहत असतील. तू त्यांना जाऊन सांग, गावात सर्व परिस्थिती ठीक आहे. पण नारायणला वाटले, गोजरबाईंच्या मुलीचा पत्ता लागत नाही. पगारे गावात येत नाही अशा परिस्थितीत हा मला परत का पाठवतो आहे ? शिरढोणकर म्हणतो, " पाहा, इकडली काळजी करू नकोस. " अरे, तू गेलास तरी मी आहे ना त्यांच्या रक्तानात्याचा हे ऐकल्यावर नारायणला वाटले की रक्तानात्याचेच महत्त्व या देशात आहे का ? माने व शिरढोणकराला मी येथून जावेसे का वाटते ? लोक म्हणत होते की पगारेच्या मुलीला पाण्यात टाकली, कोण म्हणे घाणीत कापून टाकली असेल, बारवेत पाय घसरून पडली असेल. या लहान मुलीने कोणता गुन्हा केला आहे म्हणून तिला ही शिक्षा ? काय म्हणून तिच्यावर हा प्रसंग यावा ? दुष्काळातील परिस्थितीत माणसं माणुसकीहीन का होतात ? असे अनेक प्रश्न नारायणला पडतात.

गावातील कामे झाल्यावर नारायण दमून शिवमंदिरात गेला. तेथे त्याच गावची काही तरुण मुलं पत्ते खेळत बसलेली त्याला दिसली नारायणला पाहून ते त्याची टवाळी करू लागतात.

" काय हो, काय नाव तुमचं, कलू कलू.....
तिच्यायला नाव बी लई अवगड हाय, काय कल्ल..."
" अरं कल्लोळी रं......"
"च्या आयलीला असलं कसलं नाव रं हये, कल्लोळी म्हणं..."
"च्या हे काय नाव झालं श "
हो त्यापेक्षा कांबळे पिंगळे असली नावं परवडली.
या हो कल्लोळी, बसा जरा बोला की आमच्याशी
"आयला तुळजापूरला एक कल्लोळी हाय बग"
" आो फुडारी येता न्हवं "
" जाऊ दे रे लयी फुडारपन करायला निघालाय. मायला ह्याच्या

दुसरा एकजण शिव्या देत नारायणाला मारू लागला. त्यातून ही नारायणाने स्वत:ला सोडवून घेतले. नारायणाला वाटले की आपण गावासाठी जे कष्टकेले, त्याचा उपयोग झाला नाही. आपले अस्तित्व इथं काही उरलेच नाही. कोणी बोलत नाही. फक्त गोजरबाई बोलते तर तिच्यावरही गावातील लोकांनी संशय घेतला. गावात अधिकारी, पोलीस, कलेक्टर येऊन गेल्यानंतर सर्व दलितांना नदीवर कपडे धुवायला, दळून दयायला परवानगी दिली जाते. पण सधन शेतक-याच्या मळयात कामे दिली जात नाहीत. वर्तमानपत्रात छापून येणा-या बातम्या बंद झाल्या. तरीही नारायण संघर्षाच्या नदीत गंटागळया खात आहे. या सर्वांमध्ये कोण पुरोगामी ? कोण प्रतिगामी ? कोण प्रामाणिक ? कोण ढोंगी ? कोण खरा ? कोण खोटा कोण निर्दोष या प्रश्नांचे थैमान नारायणाच्या डोक्यात घोंगावू लागले.

नारायणाला वाटले की कशाचा जीर्णोद्धार ? कशाची प्राणप्रतिष्ठापना ? या लोकांच्यात काही अर्थ नाही. या भ्रष्टाचारी समाजातून बाहेर पडायला पाहिजे.

नारायणाने सर्व सामाजिक कामे केली. तरीही गावातील संघर्ष, हेवेदावे, ताण-तणाव संपला नाही. नारायण यासर्वाला कंटाळला आहे. म्हणून स्वत:लाच म्हणतो की " चक् चक् चक् चक्.....जणू काळोखालाच शब्द फुटलेत नागा धिराजा तिकडे कुठे चालला आहेस, तू इकडे ये. मी तुझ्या हाती माझे प्राण सोपवायला तयार आहे. किमान तुझ्याकडे तरी तो सुरक्षित राहील....ये, ये..." हे बोलून त्याला झोप लागते. मध्यरात्र झाल्यावर तो शुध्दीवर आला तर त्यांच्या अंगाला गार वारा झोंबला, दूरवर पाऊस पडत असल्यासारखा आवाज येऊ लागला. तेवढयात गावातील चार लोकांनी त्याला माळावर नेऊन सोडले. ते लोक त्याला म्हणाले की सकाळी बस आली सुखाने जा. पुन्हा इकडे येऊ नकोस, काळोखाचे हुंकार अधिकच धारदार, विषारी झाले. ते शब्दच नागफण्यासारखे कोळाखात डोलू लागले. नारायणाला वाटले कोण असावेत हे ? मानेची माणसं की शिरढोणकराची

की आणखीन कुणी तिसरी माणसं आहेत ! कुणीही असले तरी काय फरक पडणार आहे ! सर्वजण सारखेच आहेत.

घोडेगावातील पाटील, शिरढोणकर, माने या सर्वांच्या ठिकाणी नारायणाला काळोख दिसला. गोजरबाईच्या मुलीच्या डोळ्यातील भीती, पगारेच्या पायाची गती व मनातील धास्ती म्हणजे काळोख आहे. शिवमंदिराचा जीर्णोद्दार, गढीवरचे घुबड हेही काळोख आहे.

रामाच्या डोळ्यातील ठिणग्या, शिदंयाना मारलेल्या लाथा, त्यांच्या बायकोची फाटलेली चोळी, पांडया मांगाने दिलेली दवंडी, कुंभाराचे गरगरणारे चाक या सर्वांच्या ठिकाणी त्याला काळोख दिसला आहे. या काळोखात नारायण एकटा नाही तर त्यांच्या जोडीला झोंबणारा गार वारा आहे. या काळोखात नारायण सकाळ होण्याची वाट पहात होता. तर त्याला पुन्हा-पुन्हा काळोखाच्या हसण्याचे ध्वनी प्रतिध्वनितहोऊन ऐकू येत राहिले.

सारांश :

नागनाथ कोत्तापल्ले यांनी " उलट चालिला प्रवाहो", या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनातील परंपरा, रूढी, चालीरिती, विविध निष्ठा, वंशपरंपरागत वैर, निरागसपणा, रंगेलपणा, निवडणुका, राजकारण या सर्व गोष्टींचे चित्रण केले आहे.

या कादंबरीमध्ये दिसणारे श्रीमंत, ऐषआरामात राहणारे लोक आहेत. ते सतत दलित व सवर्ण लोकांची पिळवणूक करतात व राजकारण खेळतात. पगारेसारख्या लोकांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त करतात. श्रीमंताचे राजकारण गरिबांमध्ये संघर्ष घडवून आणते. राजकारणाने सर्व गावच संघर्षमय होऊन गेले आहे. सर्व चालीरीती, रूढी, परंपरा, अंध:श्रध्दा याला धरून चालणारे गाव राजकारणाने पेटले आहे. गावाला कोणी

समाज कार्यकर्त्यांनी सुधारण्याचा प्रयत्न केला तरी ते सुधारले नाही. सतत संघर्षाने गाव पेटत राहिलेले दिसते.

अशाप्रकारे " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीच्या कथानकाचा आपण थोडक्यात परिचय करुन घेतला. यानंतर या कादंबरीतील काहीप्रमुख व गौण व्यक्तिरेखांचा परिचय करुन घेऊ.

## "उलट चालिला प्रवाहो," या कादंबरीतील काही प्रमुख व्यक्तिरेखा

कादंबरीतील कथानकास जो अर्थ प्राप्त होतो व मूल्य लाभते ते व्यक्तींमुळेच. व्यक्तींमुळेच कादंबरीतील घटनांचे आकर्षण वाढते. कादंबरीतील पात्रे प्रथम लेखकाच्या कल्पनेत आकाराला येतात. नंतर कथानकाची जुळणी होत असते. कादंबरीतील पात्रे वास्तव व जिवंत असावीत त्यांचे वागणे त्यांच्या स्वभावाशी सुसंगत असावे व वाचकांसमोर ती मूर्तिमंत साकार व्हावीत एवढीच कादंबरीत अपेक्षा असते.

### नारायण कल्लोळी :

नारायण कल्लोळी कादंबरीचा नायक आहे. घोडेगावातील दलित सवर्ण संघर्ष मिटवण्यासाठी नानासाहेबाने नारायणाला पाठवले आहे. कॉलेजमध्ये शिकत असताना त्याचा सुमनशी लग्न करायचा विचार असतो. परंतु तिचे वडिल सनातनी असल्यामुळे तिचे एका कारकुनाबरोबर लग्न होते. तेव्हा त्याने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला असतो. पण त्यावेळी नानासाहेबांनी व वहिनींनी त्याला धीर दिलेला आहे. असा हा नारायण सामाजिक जाणिवेच्या भावनेतून घोडेगावात आला आहे. सामाजिक संघर्ष संपावेत, समाज सुखी व्हावा ही त्यांची प्रामाणिक इच्छा आहे. परंतु त्याची ही इच्छा सफल होत नाही. उलट एक प्रकारची भीषण निराशा त्यांच्या पदरी येते. गावात संघर्ष, तणाव,

हेवेदावे आहेत. ते कुठं तरी संपले पाहिजेत या उद्देशाने नारायण गावामध्ये आलेला आहे. नारायण गढीवर रहायला न जाता शिव-मंदिरात राहतो. नारायणाला गावातील गढीच उद्ध्वस्त करायची असते. तो दुस-या दिवशी पाटलांकडे गेल्यावर पाटील त्याला म्हणाले, " तू चौकशी करायला आला आहेस तर चौकशीच कर " नारायणाला पाटलांना सांगावेसे वाटते की " गाव तुमचा, तुम्ही पाटील गावचे. आणि सरपंचही. मी उपरा. परका, तुमच्या गावातील तिढा तुम्ही उकला. तुम्ही मिटवा." परंतु हे त्यांना सांगण्याच्या अगोदरच पाटील रागाने त्याला बोलले. नारायण काही न बोलता गढीतून निघून येतो.

नारायणाने सेवाभावी संघटनेमध्ये खुर्च्या, सतरंज्या, उचलण्या-पासून झाडलोट करण्यापर्यंत सर्व कामे केली होती. नानासाहेबांशी गोड बोलून मानेने सेक्रेटरी पद घेतले हे नारायणाला कळल्यावर उदास झाला. नानासाहेबांनी त्याला समजावून सांगितले. "'अरे, या सनातन-त्वाविरूद्ध तर लढायचं." हे नारायणाला कळत होते तरीही त्याला वाटले की संघटना तर संपणार नाही ना या सनातनत्वात. आपण कल्लोळी या आडनावासह सीमारेषा पार करू शकतो याचा आनंद त्याला झाला. तो गावामध्ये येऊन धडकला.

नारायण गावात गेल्यावर लोकांनी गावातील परिस्थिती सांगण्याऐवजी कोण आले आहे, कशासाठी आले आहे याची चर्चा सुरु केली. गावातील तरुण पिढी, मस्ती करत पत्ते खेळत बसलेली त्याला दिसली. नारायणाला हे कुठं तरी संपले पाहिजे असे वाटले. या टोळ-क्यात स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगाही सामील होता. तो रोज नारायणाचे जेवण घेऊन मंदिरात जातो."पण नारायणाबरोबर तो बोलत नाही.

नारायण झोपड्या जळलेल्या पाहण्यासाठी गेल्यावर अर्धवट जळलेल्या झोपडीमध्ये तीन-चार वर्षांचा " इठू " त्याला दिसला. तो दोन-तीन दिवस उपाशी असून मोठ्याने रडत होता. नारायणाने त्याला

प्रेमाने जवळ घेऊन विचारपूस केली. गोजरबाई खडी केंद्रावर कामाला गेली आहे. त्याने तिथे जाऊन " इठू " ला दिले. त्यावेळी गोजरबाईने घडलेली परिस्थिती त्याला सांगितल्यावर नारायणाच्या डोक्यात अनेक विचार आले. गावातील राजकारणाने कोवळया मुलांच्या मनावर परिणाम झाला आहे म्हणून तो अस्वस्थ होतो.

नारायणाचे मित्र नारायणापेक्षा वेगळे आहेत. नारायण निस्वार्थी वृत्तीने काम करत असतो, तर शिरढोणकर " स्ट्रगल फंड " जमवण्याच्या व प्रसिध्दीच्या मागे आहे. मानेचे लक्ष स्वत:ची " इमेज " कशी वाढेल इकडे आहे. शासनाची मदत मिळणार असून देखील एक पैसाही नारायणाला नको आहे. गावात कामे भरपूर असतात. पगारे गावात येत नाही. मुलीचा शोध लागत नाही. तरीही शिरढोणकर नारायणाला म्हणाला, " तू गावी निघून जा. मी त्यांच्या रक्तानात्याचा आहे." हे ऐकल्यावर रक्तानात्याचेच महत्त्व या देशात आहे का ? हा प्रश्न नारायणाला पडला.

तहसीलदार, पोलीस अधिकारी घोडेगावात गोजरबाईच्या मुलीच्या बेपत्ता होण्याबाबत चौकशीसाठी आलेले असतात. तेव्हा गाववाले पगारे गुंड आहे, असे त्यांना सांगतात. नारायण त्यावेळी खरी स्थिती त्यांना समजून सांगतो. गरीबासाठी तळमळणारा आपले पूर्ण आयुष्य दलितांसाठी वेचणारा नारायण तहसीलदार, पोलीस अधिकारी यांना पगारेची मुलगी शोधून काढण्याबद्दल विनंती करतो.

गावामध्ये अधिकारी, तहसीलदार, पोलीस येऊन गेल्यानंतर दलितांना नदीवर कपडे धुण्यास व दळून नेण्यास परवानगी मिळते. वर्तमान पत्रात छापून येणा-या बातम्या बंद होतात. सर्व संघर्ष, तणाव संपलेला असतो. गावातील लोकांनी वेगळेच तंत्र अवलंबिलेले असते. पाऊस पडत नाही म्हणून शिवमंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी सर्व लोक कामाला लागलेले असतात. तरीही नारायण संघर्षांच्या नदीत गटांगळया खात असतो.

लोक नारायणबरोबर बोलायचे बंद होतात. या सर्वांमध्ये कोण पुरोगामी ? कोण प्रतिगामी ? कोण प्रामाणिक ? कोण ढोंगी कोण खरा ? कोण खोटा ? कोण निर्दोष ? अशा अनेक प्रश्नांचे थैमान नारायणाच्या डोक्यात घोंगावू लागते.

नारायणाला वाटले, कशाचा जीर्णोद्धार ? कशाची प्राण-प्रतिष्ठापना ? या लोकांच्यात काही अर्थ नाही. भ्रष्टाचारी समाजातून बाहेर पडायला पाहिजे-पण त्याच्या हातापायातील बळ संपल्यामुळे त्याला काही करता येत नाही. काळोखातून सापाने येऊन दंश केला तर सर्व प्रश्नांतून सुटका होईल असे त्याला वाटते. आता करण्यासारखे तरी काय उरलंय ? नारायणाला जीवन नकोसे झाले. सर्व सामाजिक कामे केली, पण ताण-तणाव संघर्ष संपला नाही.

नारायणाला झोपलेल्या अवस्थेत लोकांनी उचलून नेले. त्याला माळावर सोडले. ते लोक त्याला म्हणाले की " तुला खूप मारले असते. पण नाही, तू ज्या बसने आलास ती बस सकाळी येईल. तू तुझ्या गावी निघून जा. पुन्हा इकडे येऊ नकोस. हे शब्दच नागफण्यासारखे काळोखात डोलू लागले. नारायणाला वाटले कोण असावेत हे ? मानेची माणसं की शिरढोणकरची ? की गढीवरची ? की आणखी कुणी तिसरी-च माणसं आहेत ? कुणीही असले तरी काय फरक पडणार आहे? सर्व-जण सारखेच आहेत.

या सर्वांच्या ठिकाणी नारायणाला काळोखच दिसला. गोजर-बाईच्या मुलीच्या डोळ्यातील भीती, पगारेच्या पायाची गती, मना-तील धास्ती, शिवमंदिराचा जीर्णोद्धार, गढीवरचे घुबड, रामाच्या डोळ्यातील ठिणग्या, शिंदेंयांना मारलेल्या लाथा, त्यांच्या बायकोची फाटलेली चोळी, मानेची काव्यकल्पना, नानासाहेबांचा पराभव हा सर्व काळोख आहे. या काळोखात नारायण एकटा नाही. त्याच्या जोडीला झोंबणारा गार वारा आहे. या काळोखात नारायण सकाळ होण्याची वाट पाहत होता. तर त्याला पुन्हा-पुन्हा काळोखाच्या हसण्याचे ध्वनी, प्रतिध्वनित ऐकू येत राहिले.

नारायणने गावासाठी खूप कष्ट केले. त्या कष्टाचे चीज झाले नाही. नारायण गावातील संघर्ष मिटवण्यासाठी आला आहे. त्याला मदत करण्याऐवजी त्याच्या नावालाही मुले नावे ठेवू लागली. शासनाने मंजूर केलेली मदत मिळणार होती. त्यातील त्याला एक पैसाही नको असतो. तरीही लोक त्याला गावातून बाहेर काढू लागले. ऐषआरामात राहणा-या पाटलांना तो आलेला आवडत नाही. आपले आयुष्य त्याने गावातील परिस्थिती सुधारण्यासाठी घालवले. स्वत:कडे लक्ष दिले नाही. तरीही तो लोकांना नकोसा झाला.

अशा रीतीने नारायण हा एक विश्वासू, प्रामाणिक, सामाजिक कार्यकर्ता आहे. त्याच्या कार्याचे, स्वप्नाचे चीज होत नाही. शेवटी त्याचा पराभवच होतो.

पाटील :
-------

पाटील ही या कादंबरीतील आणखी एक प्रमुख व्यक्तिरेखा आहे. पाटील घोडेगावातील सरपंच आहे. गावावर त्याचा दबाव आहे. पाटील हुशार व मुत्सद्दी आहे. त्यांच्या जुन्या-पुराण्या गढीमध्ये अमाप खजिना आहे.

घोडेगावातील परिस्थिती पहायला आलेल्या अधिका-यांना तो गावातील परिस्थिती सांगत नाही. उलट सर्व व्यवस्थित आहे म्हणून सांगतो. त्यांना गढीवर नेऊन मेजवानी देतो. तेथूनच त्यांना परत पाठवतो. नारायण घोडेगावातील संघर्ष मिटवण्यासाठी आला आहे हे पाटलाला कळते. नारायण गावात आलेला आहे हे त्याला आवडत नाही. स्वत: ऐषआरामात रहाणा-या पाटलाने दलितांमध्ये भांडण, तंटा, संघर्ष, हेवेदावे निर्माण केले. पाटील गावातीलपरिस्थिती जाणून घेत नाही. गाव सर्व ताब्यात असावा, सर्वांनी मलाच विचारावे, मीच या ठिकाणचा राजा असावा ही त्यांची वृत्ती आहे.

अशा या पाटलांना भेटायला नारायण गेला. पाटील त्याला म्हणाले, तू चौकशी करायला आला आहेस तर चौकशीच कर. पाटलाने गावातील परिस्थिती त्याला समजावून सांगितली नाही. नारायणला वाटते पाटलांना समजून सांगावे. " गाव तुमचाच आहे. तुम्ही पाटील व सरपंचही गावचे. गावातील तिटा तुम्ही मिटवा", परंतु हे सांगायच्या अगोदरच पाटील त्याला रागाने बोलले म्हणून नारायण निघून गेला. गोजरबाईंच्या मुलीचा पत्ता का लागत नाही. पगारे गावात का येत नाही. झोपडया कुणी जाळल्या याची चौकशी तो करत नाही. पाटील पानाची रंवथ करीत गढीत बसलेला असतो. गावामध्ये दलित-सवर्ण संघर्ष चालू ठेवणारा, कशाकडेही लक्ष न देणारा, गाव माझ्याच ताब्यात असावा, माझ्या म्हणण्याप्रमाणे चालावे या मताचा हा पाटील आपमतलबी माणूस आहे. स्वातंत्र्यसैनिकांनी कष्टाने स्वातंत्र्य मिळवले. त्यांचे महत्व न जाणता पाटलांसारख्या लोकांनी त्यांची जागा घेतली.

पाटील गावात सतत संघर्ष तंटा निर्माण करुन स्वत: ऐषआरामात जीवन जगतो. परंपरागत समाजव्यवस्थेचा प्रतिनिधी म्हणून पाटलाची व्यक्तिरेखा रेखाटण्यात लेखक यशस्वी झाला आहे असे म्हणावे लागेल.

## नानासाहेब :

नानासाहेब ही या कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. नानासाहेब व सदाशिवराव शिंदे यांच्या सारख्या स्वातंत्र्यसैनिकाचा देशाच्या स्वातंत्र्यात महत्त्वाचा सहभाग आहे. इंग्रजांच्या गोळया अंगावर झेलून उदयाची पिढी सुखी होईल, या आशेने ते दोघेही जगत असतात. जे लोक प्रतिष्ठित मानले तेच अप्रतिष्ठित झाले. त्यामुळे नानासाहेबांने गावातील कार्यातून अंग काढून घेतले. ते वकिली करत एक सेवाभावी संघटना चालवू लागले.

नानासाहेबांचे सर्व आयुष्य कष्टात गेले. नानासाहेबांची सभा सुरु झाली. सभेमध्ये कोणी तरी गाढवाला सोडल्यावर दंगा झाला. त्यांनी

लोकाना शांत करून पूर्ववत सभा सुरू केली व म्हणाले, " कोणत्या गाढवानं त्या गाढवाला इथं आणलं ! " हे ऐकल्यावर सारी सभा खदखदून हसली. सभा संपल्यावर त्या मुलाने येऊन नानासाहेबांचे पाय धरून माफी मागितली. त्याला नानासाहेब रागवले नाहीत. मुलांला त्यांनी घरी येण्यास सांगितले तो तापाने फणफणत असलेला व कोणी तरी मारलेल्या अवस्थेत नानासाहेबांच्या घरी आला. नानासाहेब व वहिनींनी औषधपाणी करून तो पूर्ण बरा झाल्यावर त्याच्या घरी पाठवले. याठिकाणी माणुसकीचे चित्र पहायला मिळाले. नानासाहेबांना कुणी तरी विचारले म्हणून त्याला म्हणाले, " अरे, मतभेदाच्या ठिकाणी मतभेद, मतभेद बाजूला ठेवून आपण एकमेंकावरती नाही का प्रेम करू शकत...?" अर्थात मतभेद राहिलेच नाहीत. तो मुलगा नानासाहेब व वहिनी यांच्यात मिसळला.

नानासाहेबांनी संघटनेतील मुलांना स्वत:ची मुलं मानून त्यांना घरातल्याप्रमाणे वागणूक दिली. संघटनेचे सेक्रेटरी पदही दुस-याला मिळाले. तेव्हा नानासाहेब नारायणाला म्हणाले. " अरे, या सनातनात्वाविरुध्द तर लढायचं ! अरे, कल्लोबी कोणतेही पद महत्त्वाचे नसते. काम महत्त्वाचे असते."

नानासाहेब वकील असतात. त्यांनी चांगल्या मार्गाने पोटापुरता लागेल तेवढाच पैसा मिळवला. ज्या लोकांना आंदोलनामध्ये अटक झाली त्यांना स्वत:चे पैसे भरून सोडवून आणले. वहिनींनी त्यांना नेहमी साथ दिली. नानासाहेबांचे सर्व आयुष्य दुस-यांना मदत करायला व सुखी करायला खर्ची पडले. त्यांनी स्वत:चा व बायकोचा विचार केला नाही. कुटुंबाचा विकासही केला नाही. अशा नानासाहेबांवर लोक मायेचा वर्षाव करीत होते. घोडेगावातील संघर्ष कुठे तरी संपवायला हवा या मताचे नानासाहेब आहेत. परंतु त्यांची ही इच्छा सफल झाली नाही.

सदाशिवराव शिंदे

सदाशिवराव शिंदे स्वातंत्र्यसैनिक असतात. नारायणने सदाशिवराव शिंदयांसारखे साधे, सरळ स्वातंत्र्यसैनिक पाहिले नव्हते. मोठे बंगलेवाले, वेगवेगळ्या कमिटयावर जाऊन अपहार करणारे, दारूचा काळाबाजार करणारे स्वातंत्र्यसैनिक त्याने पाहिले होते. या सर्वांपेक्षा शिंदे वेगळे वाटतात.

नानासाहेब व शिंदे पूर्वीपासून एकत्र होते. नानासाहेब वकील झाल्यावर शहरात राहिले. शिंदे घोडेगावातच राहिले. अजूनही शिंदयांना नानासाहेबांची आठवण आली की म्हातारपण विसरून तरतरीतपणा येतो. शिंदयांना वाटले स्वातंत्र्य मिळवण्यात खूप कष्ट केले. उदयाची पिढी सुखी झालेली पहायला मिळेल. मरताना समाधान लाभेल. पण सर्व चक्र उलटे फिरलेले असते. पांडोबा हा शिंदयांचा मुलगा आहे. परंतु शिंदे व पांडोबा या दोघांच्या विचारांमध्ये फरक आहे. नारायणला मदत करण्या ऐवजी तो गावातील मुलांबरोबर मंदिरात पत्ते खेळत बसलेला असतो. शिंदयांनी संघर्ष थांबवण्यासाठी प्रयत्न केले. परंतु त्याचाही उपयोग झाला नाही.

घोडक्यात शिंदयांनी दुस-या स्वातंत्र्य सैनिकासारखे बंगले बांधले नाहीत, काळाबाजार केला नाही. कष्ट करून जे मिळवले त्यामध्ये त्यांनी सुख मानले. आपण स्वातंत्र्यसैनिक आहोत म्हणून कधी कुणाला त्रास दिला नाही. या दृष्टीने ही व्यक्तिरेखा लक्षात राहते.

गोजरबाई :

गोजरबाई ही या कादंबरीतील आणखी एक महत्वाची व्यक्तिरेखा आहे. विसाव्या शतकात भौतिक सुधारणा घडून आल्या. तरीही असंख्य लोकांना दोन वेळच्या भाकरीसाठी अतोनात कष्ट करावे लागत

12900
A

आहेत. दारिद्र्याच्या कचाट्यात असंख्य माणसे होरपळून निघत आहेत. साध्या स्वप्नांनासुध्दा त्यांना मुकावे लागते. गोजरबाईच्या रूपाने अशाच एका कष्टकरी स्त्रीचे दर्शन या कादंबरीत घडते. कुठल्याही परिस्थितीत पाय रोवून रोजचा दिवस सुखदु:खासकट उमेदीने ढकलणारी गोजरबाई व तिच्या भोवतालचे लोक यांच्यामध्ये संघर्ष सुरू आहे.

गोजरबाई घोडेगावात राहणारी दलित स्त्री आहे. तिचा नवरा, दोन मुले, मजुरी करून पोटभर खाऊन कसं तरी जीवन जगतात. हरिभाऊ पगारेने व त्याच्या नातेवाईकांनी विरोधी पक्षाला मते दिली म्हणून गावातील लोकांनी चिडून दलित वस्तीतील झोपड्या जाळल्या. हे पहायला नारायण गेला तर पगारेच्या अर्धवट जळलेल्या घरामध्ये तीन-चार वर्षांचा उपाशी मुलगा मोठ्याने रडत होता. गावातील कोणी त्या मुलाकडे लक्ष दिले नाही. मायेने जवळ घेतले नाही. नारायणाने " इठू"ला घेऊन प्रेमाने त्याची विचारपूस केली. त्याची आई खडी केंद्रावर कामाला गेली होती. नारायण " इठू " ला घेऊन आलेला आहे हे पाहिल्यावर गोजर-बाईने पायाला लागणाऱ्या दगडाची पर्वा न करता पळत येऊन त्याला प्रेमाने घेतले. इथे नारायणाने मातृत्वाच्या थोरवीचे रूप पाहिले. पगारे गेल्यापासून गोजरबाई खडी केंद्रावर काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करू लागली होती. पगारेने विरोधी पक्षाला मते दिली म्हणून गावातील लोकांनी त्याला हाकलून दिले. तो परत येईल म्हणून त्याच्या घराभोवती पहारा होता. त्याच्या कोवळ्या मुलीचा काहीच्च दोष नसूनही तिला लोकांनी पळवून नेले.

गोजरबाईने पगारेला सांगितले, " तुम्ही इकडे येऊ नका. सर्व शांत झाले की या. काही तरी मार्ग निघेलच. मी दोन मुलांना घेऊन कशीही राहीन. तुम्ही जा," हे तिने सांगितल्यापासून तो गावात येत नाही. मग तिच्या मुलीचा शोध घेण्यासाठी नारायणाशिवाय गावातील कोणीही धडपडत नाही.

गोजरबाईला व अन्य स्त्रियांना शिरढोणकराने पैसे मागितले. कोणी पैसे दिले नाही म्हणून तो चिडला. गावातील परिस्थिती

गोजरबाईने नारायणाला जाऊन सांगितली. त्यामुळे त्या दोघांचे संबंध आहेत अशी अफवा लोकांनी उठवली. गलिच्छ राजकारणाने सामाजिक जीवनातील संघर्ष वाढून एक कुटुंब धुळीला मिळते.

एकूणच गरीब स्त्री व तिचा नवरा कष्ट करून कसे तरी जीवन जगताहेत. तरीही त्यांचे सर्व कुटुंब उद्ध्वस्त होते. घरातही राहू दिले जात नाही. मुलीला कोणी पळवून नेले हे पहायला घरी मोठे कोणी नाही. तरीही गोजरबाई सर्व प्रसंगांना सामोरे जाऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. एक धीट दलित स्त्री म्हणून ही व्यक्तिरेखा लक्षात राहते.

रावसाहेब माने :
-------------

माने सेवाभावी संघटनेचा सेक्रेटरी असतो. गावातील लोक मानेला नेता मानतात. मानेच्या नावावर अडीचशे तीनशे एकर शेती आहे. विहिरी व दोन तीन मळे आहेत. म्हणून लोकांनी मानेला सेक्रेटरी पद दिले. सेक्रेटरी पद मिळाल्यावर त्याने आपले फायदे करून घ्यायला मागे पुढे पाहिले नाही. तो स्वतःची " इमेज " राखून दुसऱ्याची कामे करून देऊ लागला.

दुसऱ्यावेळी झोपडया जळाल्या हे पहायला माने गावात आला. त्याने गढीवरील गवत, लाकडे, वासे आणून एका दिवसात झोपडया, उभ्या करून दिल्या. ही त्याला प्रसिध्दी मिळवण्याची संधीच आली होती. माने नेहमी म्हणायचा " मास बेस" असल्याशिवाय नेतृत्व टिकत नाही.

माने महत्त्वाकांक्षी, मुत्सद्दी, बुध्दिमान आहे. बुध्दिवादी दृष्टिकोणापेक्षा सर्वसामान्य माणसांच्या भावनांना कसा हात घालावा हे त्याला चांगले कळालेले आहे.समता प्रस्थापित करू इच्छिणाऱ्या, सामाजिक लढे देणाऱ्या सेवाभावी संघटनेचा तो सेक्रेटरी आहे. तो कॉलेजमध्ये असताना शिक्षकाची टिंगल करण्यापासून मुलींची छेडाछेड काढण्यात तो सर्वांत पुढे असतो. अभ्यासात फारशी गती नसली तरी सगळीकडे माने आघाडीवर असतो. कॉलेजच्या निवडणुकीत भाग घ्यायलाही

तो धडपडत असतो. सेक्रेटरी झाल्यापासून त्याचे वागणे बदलले आहे. त्याने सर्वांना जातीने नावे घेऊन बोलवण्यास सुरुवात केली. तो एका मित्राला म्हणाला, " ते लांडं कुठ गेलं रं " असे म्हटल्यावर मारामारीपर्यंत वेळ आली. ते भांडण नारायणने सोडवले.

गृहमंत्र्यांना निवेदन दिले जाते त्यावेळी नारायण त्याला विचारतो, " तू गोजरबाईच्या मुलीबद्दल का बोलला नाहीस ?" तेव्हा तो म्हणतो, "अरे, यार भावविवश होऊन प्रश्न सुटत नाहीत. समाजात काय घडते ते डोकं थंड ठेवून सर्व समजून घेतलं पाहिजे. अरे, काळ एवढा भीषण आहे. माणसं अन्न-अन्न करताहेत. पाण्यासाठी रानोमाळ भटकताहेत. या काळात एखाद दुसरं असलं प्रकरण घडणारच. गावामध्ये थोडा तणाव आहे तो संपेल. लोक आज नाही उद्या एकत्र येतील. शासन सर्व बघेल, आता माझे काम संपले." हे बोलून तो निघून जातो.

एकूणच माने स्वत:ची " इमेज " राखून दुसऱ्याची कामे करून देतो. माने खोलात जाऊन कुणाची विचारपूस करत नाही. प्रसिध्दी मिळण्याएवढे काम करून मोकळा होतो. अशा प्रकारे माने हा एक प्रसिध्दीला हपापलेला ढोंगी पुढारी आहे. त्याची व्यक्तिरेखा लेखकाने कौशल्याने रंगविली आहे.

शिरढोणकर :

शिरढोणकर समाजकार्य करणारा व " स्ट्रगल फंड " जमवण्याच्या मागे लागलेला प्रसिध्दीलोलुप माणूस आहे. तो मूळचा पुण्याचा. एका शिक्षिकेच्या प्रेमात पडला व बायकामुलांना सोडून कोल्हापूरला तिच्या घरी आला. शिरढोणकरने पुण्याला जाऊन सभा घ्यायला सुरुवात केली तर तिथे त्याची बायको आलेली पाहून स्टेज सोडून कोल्हापूरला आल्यानंतर तो पुण्याला गेलाच नाही.

शिरढोणकर पूर्वी नोकरीला होता. तिथे दीड हजार रुपयाची चोरी केली म्हणून अधिका-याने त्याला तुरुंगात घातले. तो पैसे भरुन सुटून आला. त्यांची नोकरी गेल्यामुळे त्याचे काही अडले नाही. त्यांच्याकडे जीप, मॅटॅडोर, टॅक्सीज आहेत. त्याचा रोजचा खर्च शंभर-दोनशे रुपये आहे. बटन न लावलेला शर्ट, छातीवरचे भरपूर केस, डोळ्यामध्ये धमक अन् धारदार नाक असे त्याचे प्रभावी व्यक्तिमत्व आहे.

शिरढोणकर घोडेगावात आल्यावर दलितांना धीर येतो. तो खूप हुशार असतो. मुख्यमंत्र्यांना, गृहमंत्र्यांना भेटून गावातीलपरिस्थिती त्याने सांगितली. झोपड्या उभारण्यासाठी मदत मिळवली. मोठ-मोठे आमदार, खासदार यांच्याशी त्याच्या ओळखी आहेत. वर्तमानपत्राच्या प्रत्येक कार्यालयात आपले विविध " पोझेस " मधले ब्लॉक त्याने नेऊन ठेवले होते. वार्ताहरांशी त्याचे आंतरिक संबंध चांगले होते. एखादया दिवशी वर्तमानपत्रात फोटो छापून आला नाही तर त्याला झोप लागत नाही. आपली बातमी व फोटो, छापून आले की त्याला समाजपरिवर्तन झाले आहे असे वाटते.

भयाण दुष्काळ, खायला अन्न नाही, जनावरांना चारा-पाणी-कडबा नाही अशा स्थितीत शिरढोणकरने " स्ट्रगल फंड " जमवण्यासाठी व दौरे करण्यासाठी गोजरबाईला व अन्य स्त्रियांना पैसे मागितले. त्यांनी कोणी पैसे दिले नाहीत म्हणून तो चिडला. शासनाने मदत मंजूर केली आहे व ती तहसीलदार घेऊन येणार आहे हे कळल्यावर तो नारायणला म्हणाला, " नानासाहेब वाट पहात असतील, तू तुझ्या गावी जा. इकडली काळजी करु नकोस. अरे, तू गेलास तरी मी आहे ना त्यांच्या रक्तानात्याचा." हे त्याचे बोलणे नारायणला लागले.

शिरढोणकर प्रसिध्दीला हापापलेला आहे. स्वत:चा विकास करुन घेण्यात गुंतला आहे. स्वत:ला प्रसिध्दी मिळावी म्हणून आपले, विविध " पोझेस" मधले फोटो व लेख तो वर्तमानपत्रात देतो. असा हा शिरढोणकर पैसे मिळवण्याच्या मागे लागलेला आहे.

अशा प्रकारे " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीतील काही प्रमुख व्यक्तिरेखांचा अभ्यास आपण केला. या कादंबरीतील काही प्रमुख व्यक्तिरेखांचा अभ्यास केल्यानंतर या कादंबरीतील समाजजीवनाच्या चित्रणाचा अभ्यास करणे योग्य ठरेल. कारण समाजीवनाचे चित्रण हेच कादंबरीचे आशयद्रव्य असते. त्यादृष्टीने या कादंबरीतील समाज-चित्रणाचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल .

"उलट चालिला प्रवाहो", या कादंबरीतील समाजजीवनाचे चित्रण :

समाजामध्ये वेगवेगळ्या प्रवृत्तीची माणसे असतात. प्रत्येक माणसांचा स्वभाव वेगळा, आवड-निवड वेगळी, आशा-आकांक्षा वेगळ्या, प्रत्येकाची विचार करण्याची कुवत भिन्न. या वेगळेपणातूनच संघर्ष निर्माण होतात. अशाच सामाजिक संघर्षाचे वर्णन " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीमध्ये दिसून येते.

या कादंबरीतील घटना व पात्रे ही विशिष्ट समाजाशी निगडित आहेत. कादंबरीतील पात्रांची वर्णने त्यांचे स्वभावविशेष, त्यांचे संवाद, त्यांचे आचार-विचार यातून समाजाचे अस्तित्व जाणवत राहते. येथील माणसे ती ज्या ग्रामीण समाजाचा घटक आहेत त्या समाजापासून वेगळी काढता येत नाहीत. या संदर्भात एक बाब लक्षात घेतली पाहिजे की आजचे बदलते ग्रामीण जीवन, तेथील माणसांच्या बदलत्या मनोवृत्ती हाच या कादंबरीचा महत्त्वाचा विषय आहे. त्या दृष्टीने पाहता एके-काळच्या ग्रामीण साहित्यातून आलेले ग्रामीण जीवन आणि आजचे ग्रामीण जीवन यात फार मोठा भेद आहे. या संदर्भात भास्कर चंदनशिव लिहितात, " ग्रामीण साहित्य म्हणजे शहरी वाचकांना खेड्यातील माणसांचे, तिथल्या निसर्गाचे, त्यांच्या, रूढी, पारंपरिक संकेताचे स्थूल माहितीवजा दर्शन घेण्याचे एक साधन वाटत असे. त्यांचे प्रेम, संघर्ष रीती-रिवाज, आणि त्यासाठी त्यातून व्यक्त होणारे रंगेल जीवनाचे रूप केवळ काही तरी वेगळे आहे. एवढीच जाणीव या ग्रामीण साहित्या-

संबंधी वाचकांची असायची, निसर्ग, भाषा, वातावरण पारंपरिक रूढी, समजुती, रीतीरिवाज, श्रध्दा आदी आनुषंगिक गोष्टीबरोबरच माणूस पहाण्याचा आणि शोधण्याचा प्रयत्न आज ग्रामीण साहित्या- मधून होतो".[१] नागनाथ कोत्तापल्ले यांनी " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीतून हे बदलणारे ग्रामीण वास्तव वाचकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक व धार्मिक या क्षेत्रातील दांभिकतेबद्दल असलेला विलक्षण संताप या कादंबरीमध्ये व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरी विषयी रवींद्र ठाकूर लिहितात, " दलित वस्ती जळीत प्रकरणाची माहिती मिळवण्यासाठी आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी घोडेगावात गेलेल्या नारायण कल्लोळीला आजही वर्णव्यवस्थेची गढी तशीच अभेदय आहे हा कोलमडून टाकणारा अनुभव येतो. स्वातंत्र्यासाठी जिवाची बाजी लावणारी सदाशिवरावांची पिढी जाऊन तिची जागा आता पंडोबा सारख्या सुखवादी पिढीने घेतली आहे. ग्रामीण नेतृत्वही मानेसारख्या राजकीय स्वार्थ साधू पाहणा-या संधी-साधू आणि " स्ट्रगल फंडा"च्या नावाखाली स्वत:ची तुंबडी भरू पाहणा-या शिरढोणकरसारख्या प्रसिध्दी लोलूप माणसांनी बळकावली आहे. त्यात मूळ प्रश्न बाजूला राहून नारायणसारख्या तळमळणा-या माणसांवर लोक विश्वास ठेवीनासे होतात. त्यांच्या समाजकार्यातही त्यांची जात आडवी येते. परिवर्तनवादी विचाराची कास धरणा-या नारायणाची मानसिक घुसमट होते. कोण खोटा ? कोण खरा ? कोण प्रामाणिक कोण निर्दोष ? अशा अनेक प्रश्नांचे ओझे उरावर घेऊन नारायण गावाबाहेर पडतो. पण गावाने टाकून दिल्यावर सकाळ होण्याची वाट पाहत बसलेल्या नारायणाच्या भोवती काळोखाच्या हसण्याचे ध्वनी पुन्हा पुन्हा प्रतिध्वनित होत राहतात."[२]

नारायण सामाजिक कार्यकर्ता व सेवाभावी संघटनेमध्ये काम करणारा विश्वासू तरुण आहे. नानासाहेबांने त्याला घोडेगावातील दलित व सवर्ण संघर्ष मिटवण्यासाठी पाठवून दिले आहे. गावात पाटील आहे. त्याचा सर्व गावावर दबाव आहे. पाटील सांगेल त्याप्रमाणे गाव ऐकते. गावातील लोकांना विचार, भावना व्यक्त करण्याचे व मांडण्याचे

सामर्थ्य असूनही ते मांडत नाहीत.

दलित सवर्ण संघर्ष :

स्वातंत्र्यसैनिक सदाशिवराव शिंदेयांनी घोडेगावातील दलित सवर्ण संघर्षाची सर्व परिस्थिती सरकारला कळवली. परंतु सरकारने काही केले नाही. गावातील संघर्ष कुठं तरी संपायला हवा असे नानासाहेबांना वाटले. त्यांनी सेवाभावी संघटनेत काम करणा-या नारायणाला घोडेगावातील दलित व सवर्ण संघर्ष मिटवण्यासाठी पाठवले आहे. परंतु त्याला मदत न करता घोडेगावातील लोक नारायण कशासाठी आला आहे याविषयी चर्चा सुरू करतात. त्याच्याकडे संशयाने पहातात. अशा स्थितीत गोजरबाईंने नारायणाला सर्व परिस्थिती सांगितली. लोकांनी सांगितलेले असतानाही हरिभाऊ पगारेने व त्याच्या नातेवाईकांनी विरोधी पक्षाला मते दिली. त्यामुळे गावातील लोकांनी उभा केलेला उमेदवार पडला. म्हणून लोकांनी चिडून दलितवस्ती जाळली. पगारेला मारले. त्यांच्या कोवळया मुलीला पळवून नेले.

नारायण पाटलांना भेटायला गेला. त्याला वाटले पाटलांना समजावून सांगावे. पण समजावून सांगण्याच्या अगोदर पाटील त्याला म्हणाले," तू चौकशी करायला आला आहेस तर चौकशी कर." हे त्यांचे बोलणे ऐकून तो गढीवरून परत आला. नारायणाला गढीबद्दल तिरस्कार होता. गढी सरंजामशाहीचे प्रतीक आहे. सरंजामशाहीविषयी नारायणाला चीड आहे. सतराशेसाठी पिढया गेल्या तरी गढी ढासळणार नाही. एवढी भक्कम आहे. गढी कोसळायची असेल तर एकाटयाने काम करणे शक्य नाही. लोकांना एकत्र आणले पाहिजे. गढी उद्ध्वस्त केली पाहिजे. गढी किती दिवसापासून लोकांचे शोषण करते आहे. ती कोसळली म्हणजे लोकांना आश्रितासारखे रहावे लागणार नाही. संघर्ष थांबेल व गाव गुण्यागोविंदाने नांदेल असे त्याला वाटते.

नारायणाला स्वातंत्र्यसैनिकांचा राग येतो कारण स्वातंत्र्यसैनिक म्हटले की बंगलेवाले, भ्रष्टाचार करणारे स्वातंत्र्यसैनिक नारायणाने पाहिले होते. या सर्वांपेक्षा शिंदे वेगळे होते. गावातील लोकांनी विचार न करता त्यांच्या घरी कोणी नाही असे पाहून त्यांना व त्यांच्या बायकोला मारले. परंतु त्यांचे सांत्वन करायलाही कोणी गेले नाही. दुष्काळामुळे लोकांच्या वाचा बसलेल्या असतात. लोकांनी दलितांची घरे जाळली, लोक गाव सोडून गेले, हे कुंभाराचे बोलणे नारायणाला पटले नाही. नारायणाने शाळेच्या लहान मुलांना विचारले. ती मुले कविता म्हणावी तशी त्याला सांगू लागली,

त्यांना नदीवर पाणी भरु दिलं जातं,
दुकानावर सामान दिलं जातं.
गिरणीवर दळून दिलं जातं,
कुठंच काही आडकाठी नाही.
कुणीच त्यांना बोलत नाही.
विडीच्या फुणगीने झोपडया घरे पेटली असतील
अफवा आहेत. सा-या अफवा आहेत.

मुलांनी म्हटलेली कविता ऐकून नारायण उदास झाला. कुंभाराचे चाक गरगरत होते. सुताराची करवत काही तरी कापत होती. लोहाराचे घण आदळत होते. त्याला वाटले की हा समाज म्हणजे चक्रव्यूह आहे. समाजातील प्रत्येक माणूस म्हणजे गुंतागुंतीची वर्तुळे आहेत. आपणही या चक्रव्युहाचा भाग आहोत. पाटील, शिरढोणकर, माने ही स्वयंपूर्ण वर्तुळे युगानुयुगापासून गरगरत आहेत. या वर्तुळात सापडलेला नारायण व त्याबरोबर लहान राजकुमारांचा किती बळी जाणार आहे कोण जाणे ! घोडेगावातील संघर्ष लहान मुलांच्या मनावर बिंबला आहे. ही समाजव्यवस्था रुढी परंपरा व चालीरीती यांनी बांधली आहे.

गोजरबाईच्या कोवळया निष्पाप मुलीला पळवून नेल्याची दवंडी कोणी दिली हे विचारायला नारायण पांडू मांगाकडे गेला. तो त्याच्या प्रश्नाचे उत्तर देत नाही. एकीकडे पूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले तरी पांडू मांगाला त्याचे काहीच वाटत नाही. सुखाने लालसावलेला पांडू मांग ऐषआरामात चिलिम ओढत बसला होता.

घोडेगावची वाट निष्पर्ण वठलेल्या झाडांतून गेली आहे. रस्त्याने जनावरांच्या देहाचे सांगाडे पडले आहेत. जनावरांना चारा-पाणी-कडबा नाही. काही शेतक-यांनी गुरे सोडून दिली होती. काही जनावरे वाळलेले गवत खात होती. या भयाण दुष्काळामध्ये गावात दलित व सवर्ण संघर्ष सुरु असतो.

गोजरबाई मुलीचा शोध लागला का म्हणून रोजच नारायणाला विचारते. नारायण तिचे समाधान करण्यासाठी काही तरी कारणे तिला सांगतो. गोजरबाई गढीकडे पाहून अश्रू ढाळत म्हणते, "नवरा कुठे असेल ? वितभर पोरगी कुठे असेल ?" परंतु तिच्या कुठल्याच प्रश्नाला उत्तरे नव्हती. ती गढीकडे पाहत आपल्या पूर्वजन्मीचे भोग आहेत असे म्हणून खूप रडते. तिची समजूत कोण आणि कशी घालणार ? या परिस्थितीला सामोरे जाऊन गोजरबाई जीवन कंठत होती. कुटुंबाचा उदरनिर्वाह ती मजुरी करून भागवीत असते.

नानासाहेबांनी नारायणाचे कौतुक करणारा लेख पेपरमध्ये दिला होता. त्यामध्ये लिहिले होते की, धैर्याने तोंड देणारा निधडया छातीचा तरुण, ग्रामीण लोकांच्या विश्वासाला पात्र होणा-या अशा एका कार्यकर्त्याची गरज आहे. हा लेख प्रसिध्द झाल्यावर शासनाची चक्रे फिरु लागली. गावात पत्रकार, वार्ताहर, समाजसेवक आले. वर्तमानपत्रात उलटसुलट बातम्या येऊ लागल्या.

दुस-या वेळी परिस्थिती पहायला नारायणाचे मित्र शिरढोणकर व माने हे आले होते. त्या दोघांनीही बैठका घेऊन लोकांना

आपलेसे करून घेतले. भयाण दुष्काळातही माणसं मरणाच्या मार्गावर आहेत. कामे करून कसे तरी जीवन जगताहेत. शिरढोणकरला " स्ट्रगल फंड " महत्त्वाचा वाटतो. शिरढोणकर प्रसिध्दीलोलुप आहे. या सर्वांमध्ये सामाजिक कार्य करणा-या नारायणाची ओढाताण होताना दिसते.

रावसाहेब मानेने गदीवरचे आयते लाकूड व गवत आणून दलितांना झोपडया उभारून दिल्या. झोपडयांची जागा तेवढी अधिका-यांना दाखविण्यासाठी ठेवली.

मानेचे लक्ष स्वत:ची इमेज कशी वाढेल इकडेच आहे. वर्तमानपत्रात फोटो आला की मानेला समाजपरिवर्तन झाले आहे असे वाटते. त्याने मुख्यमंत्र्यांना भेटून दलितांना मदत व रेशन पाठवायला सांगितले. नाही पाठवले तर सचिवालयावर मोर्चा काढू म्हणून धमक्या दिल्या. मुख्यमंत्र्यांना भेटून आल्याचे सांगितल्यावर नारायण त्याला म्हणाला, " गावातील प्रकरणाबद्दल तू मुख्यमंत्र्यांना बोललास का ? परंतु त्याने नाही म्हणून सांगितल्या वर नारायण चकीत झाला. नारायणला वाटले की पुरोगामी संघटनेच्या बुरख्याआडून हे गोजरबाईच्या मुलीचे प्रकरण दाबू पाहताहेत की काय ? गावात जे सुरू आहे ते किरकोळ आहे का ? गोजर-बाईची मुलगी आली नाही हे ऐकून माने हसत म्हणाला, " यार, असं भावविवश होऊन प्रश्न सुटत नाहीत. समाजामध्ये जे घडते ते डोके थंड ठेवून समजून घेतले पाहिजे. " अरे, काळ एवढा भीषण आहे, माणसं, अन्न-अन्न करताहेत. पाण्यासाठी रानोमाळ भटकताहेत. या काळात एखादं दुसरं असले प्रकरण घडणारंच" हे ऐकून नारायण त्याला म्हणाला, " तुला हे बोलणे शोभत नाही. तू पुरोगामी संघटनेचा सेक्रेटरी आहेस. हजारो माणसं रोज मरतात. लाखो प्रसंग घडतात, याचा आपण विचार केला आहे का ? डोळयासमोर भीषण घडतंय याचे तुला काही वाटत नाही का ?" हे ऐकून माने त्याला म्हणाला, " राहिलेले काम शासन बघेल ! माझं काम संपले. गावातील परिस्थितीबद्दल तू काही तरी लिहून आगीत तेल ओतू नको".

शिरढोणकर व माने यांनी गावातील लोकांना बैठका घेऊन आपलेसे करून घेतले. त्यामुळे नारायणाशी बोलणारे लोकही बोलायचे बंद झाले. गोजरबाई सर्व परिस्थिती नारायणाला सांगते. तिच्यावरही लोकांनी संशय घेतला. तिच्या मुलीबद्दलही लोकांनी अफवा उठवल्या होत्याच.

शासनाने मदत मंजूर केली आहे ती मदत तहसीलदार घेऊन येणार आहे हे कळल्यावर शिरढोणकर नारायणाला म्हणाला, " नारायण तू जा, नानासाहेब डोळ्यात प्राण आणून वाट पाहत असतील. इकडली काळजी करू नकोस. तू गेलास तरी मी आहे ना त्यांच्या रक्तानात्याचा", हे ऐकून नारायणाला वाटले, या देशात फक्त रक्ताच्या नात्यालाच महत्व आहे का ?

एकदा शिवमंदिरात पत्ते खेळत बसलेली तरूण पोरं नारायणाला म्हणाली, " अहो पाहताय काय पुढारी आत या की ...आज तरी साथ दया आम्हाला ' काय हो, काय नाव तुमचं, कलू कलू..... "
" तिच्यायला नाव बी लई अवगड हाय. काय कल्लू...."
" अरं कल्लोळी रं "
" च्या बायलीला असलं कसलं नावरं हये, कल्लोळी म्हणं... हया हे काय नाव झालं ? "
" हो त्यापेक्षा कांबळे फिंबळे असली नावं परवडली...."
" या हो कल्लोळी..बसा..जरा बोला की आमच्याशी. "
" आयला तुळजापूरला एक कल्लोळी हाय बग "
" ओ पुढारी येता न्हवं ".
" जाऊ दे रे लयी पुढारपन करायला निघालय. मायला हयाच्या " असे बोलून एकाने त्याला मारायला सुरुवात केली. नारायणाच्या हातापायातील बळ संपले होते. तरीही त्याने स्वत:ला सोडवून घेतले.

नारायण गावातील सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी, दलित–सवर्ण संघर्ष मिटवण्यासाठी आला आहे हे मुलांना माहिती आहे. तरीही परिस्थिती सांगून काम करून घेण्याऐवजी तरुण मुलांनीही त्याला संघर्षामध्ये ओढण्याचा प्रयत्न केला आहे.

गावामध्ये पोलीस अधिकारी येऊन गेल्यानंतर सर्व दलितांना नदीवर कपडे धुण्यास संधी दिली जाते. वर्तमानपत्रात छापून येणा-या बातम्या बंद होतात. सर्व तणाव व संघर्ष संपल्याचा भास होतो. पाऊस पडत नाही म्हणून सर्वजण शिवमंदिराचा जीर्णोद्धार करण्याच्या कामाला लागतात. गावातील लोकांनी वेगळेच तंत्र अवलंबिले आहे. स्त्रियांची छेड काढणे, पुरुष दिसला की थुंकणे असे प्रकार सुरु झाले आहेत. नारायण संघर्षाच्या नदीत गटांगळ्या खात आहे. नारायण-बरोबर लोकही बोलायचे बंद झाले. या सर्वांमध्ये कोण पुरोगामी? कोण प्रतिगामी ? कोण प्रामाणिक ? कोण ढोंगी ? कोण खरा ? कोण खोटा ? कोण निर्दोष ? या प्रश्नांचे थैमान नारायणाच्या डोक्यात घोंगावू लागले.

नारायणाला वाटते की कशाचा जीर्णोद्धार ? कशाची प्राण-प्रतिष्ठापना ? या लोकांच्यात अर्थ नाही. आपण आपले या भ्रष्टाचारी समाजातून बाहेर पडायला पाहिजे. हातापायातील बळ संपल्यामुळे नारायणाला काहीच करता आले नाही. काळोखातून सापाने येऊन दंश केला तर सर्व प्रश्नांतून माझी सुटका होईल असे त्याला वाटले. आता करण्यासारखे तरी काय उरलंय ? सर्व सामाजिक कामे केली. गावातील ताण-तणाव हेवेदावे, संघर्ष हा कुठं तरी संपवायला हवा होता तरी तो संपला नाही.

नारायण शिवमंदिरात झोपला होता. तो मध्यरात्र झाल्यावर जागा झाला. त्याच्या अंगाला गार वारा झोंबला. दूरवर पाऊस पडत असल्याचा आवाज त्याला आला. नारायणाला चार लोकांनी उचलून माळावर नेऊन सोडले. ते लोक त्याला म्हणाले, सकाळी बस आली की सुखाने जा, पुन्हा इकडे येऊ नकोस. काळोखाचे हुंकार अधिक

धारदार, विषारी झाले.ते शब्दच काळोखात नागफण्यासारखे डोलू लागले. नारायणाला वाटले ही माणसे कोण असावीत ! मानेची माणसं आहे का ! कुणीही असले तरी काय फरक पडणार आहे? सर्वजण सारखेच आहेत.

गोजरबाईच्या मुलीच्या डोळ्यात जी भीती आहे, तो काळोखच आहे. पगारेच्या मनातली धास्ती म्हणजे काळोखच आहे. शिवमंदिराचा जीर्णोद्धार,गढीवरचे घुबड हा ही काळोख काळोख आहे. रामाच्या डोळ्यातील ठिणग्या, शिंदेयांना मारलेल्या लाथा, त्यांच्या बायकोची फाडलेली चोळी, पांडया मांगाने दिलेली दवंडी, कुंभाराचे गरगरणारे चाक हा सर्व काळोख आहे. या काळोखात नारायण एकटा नाही. त्याच्या जोडीला गार वारा आहे. त्या काळोखात नारायण सकाळ होण्याची वाट पहात होता. तर त्याला पुन्हा पुन्हा काळोखाच्या हसण्याचे ध्वनी प्रतिध्वनित होऊन ऐकू येत राहिले.

सारांश :

पूर्वीपासून गढीमध्ये राहणारा पाटील नव्या राजकारणामुळे अधिकच प्रबळ झाला होता. तो गावात दलित-सवर्ण संघर्ष, तणाव, हेवेदावे निर्माण करतो. गावात काय परिस्थिती आहे हे पहायला येणा-या अधिका-यांना तो खरे सांगत नाही.तो गढीमध्ये ऐषआरामात राहतो. निवडणुकांमधील राजकारणाने दलित समाज पिचलेला आहे. गावातील गलिच्छ राजकारणाच्या मुळाशी ही गढी आहे. ग्रामीण समाजाला सुधारण्याच्या अगोदर माने, शिरढोणकर हे नेते स्वत:चे नेतृत्व टिकवून ठेवताना दिसतात. त्या दोघांचे लक्ष स्वत:ची " इमेज " कशी वाढेल इकडेच आहे. सत्तेच्या बळावर दलितवस्त्या उद्ध्वस्त होताहेत. हे सगळे का होते ! याला जबाबदार कोण ! या सर्व बाबीमध्ये होरपळून निघणारा ग्रामीण दलित माणूस येथे दिसतो. ज्यांनी स्वातंत्र्य

मिळवून दिले त्यांच्या वेदना कोणत्या ? परिस्थिती सुधारण्यासाठी आलेल्यांचे विचार कोणते आहेत ? या सर्व बाबींचे चित्रण या कादंबरीत दिसते.

वरीलप्रमाणे " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीत ग्रामीण जीवनाचे चित्रण कोत्तापल्ले यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

समारोप :

ग्रामीण समाजातील भ्रष्ट राजकारणाचे चित्रण या कादंबरीत येते. स्वातंत्र्यासाठी जिवाची बाजी लावणारी शिंदेयांची पिढी जाऊन तिची जागा पांडोबासारख्या सुखवादी पिढीने घेतली आहे. ग्रामीण भागाचे नेतृत्व मानेसारख्या राजकीय स्वार्थ साधू पाहणाऱ्या संधी-साधू आणि " स्ट्रगल फंडा"च्या नावाखाली स्वत:ची तुंबडी भरू पाहणाऱ्या शिरढोणकर सारख्या प्रतिष्ठीतलोलूप माणसांनी बळकावले आहे. त्यामुळे मूळ प्रश्न बाजूला राहून नारायणासारख्या तळमळीच्या कार्यकर्त्यांची ओढताण होते. ज्यांच्यासाठी तो तळमळतो तेच लोक त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत. त्याच्या समाजकार्यातही त्याची जात आडवी येते. परिवर्तनवादी विचाराची कास धरणाऱ्या नारायणाची मानसिक कुचंबणा झाली आहे. नारायण दलित व सवर्ण संघर्ष मिटवण्यासाठी व संघटनेचे नाव राखण्यासाठी जिवाची पर्वा करत नाही. तो लोकांचे वाटेल ते बोलून घेऊन येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जातो. तरी त्याचा उपयोग होत नाही.

राजकीय तणावातून समाजामध्ये अनेक प्रश्न निर्माण झालेले असतात. " उलट चालिला प्रवाहो" ही कादंबरी वाचत असताना समग्र राजकारणाने आणि जातीयतेने बरबरटलेल्या ग्रामीण जीवनाचा अनुभव येतो. नारायण गावामध्ये येऊन खूप कष्ट करतो. पण त्याचा उपयोग होत नाही. शासनाचा पैसा मिळणार आहे. परंतु तो पैसा त्याला नको आहे. गावातील कोणीही नारायणला ओळखण्याचा प्रयत्न करत नाही. खरे म्हणजे त्याचे स्वागत करायला पाहिजे होते. परंतु ते

लांबच राहिले. उलट ते त्याला काळोखात सोडण्याची शिक्षा करतात. कोण खोटा ? कोण खरा ? कोण ढोंगी ? कोण निर्दोष ? कोण प्रतिगामी ? कोण पुरोगामी ? अशा अनेक प्रश्नांचे ओझे घेऊन नारायण गावाबाहेर पडतो. माळावर बसलेल्या नारायणाच्या भोवती काळोखाच्या हसण्याचे ध्वनी पुन्हा पुन्हा प्रतिध्वनित होत राहतात.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी जे अनुभवले ते आहे तसं कादंबरीच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामीण भागातील राजकारण दलित व सवर्ण लोकांचा संसार कसा उद्ध्वस्त करतं याचे चित्र सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

कोणत्याही कादंबरीत संपूर्ण समाज जीवनाचा छेद घेतला जावा अशी अपेक्षा असते. समाज ज्या व्यक्तींनी बनलेला असतो. त्या व्यक्तींचे गुण-अवगुण, त्यांचे आचार-विचार त्यांची जीवनपध्दती, त्यांच्यावर झालेले संस्कार इत्यादी गोष्टींचे चित्रण कादंबरीमध्ये केले जाते. कादंबरी हा सामाजिक आशयद्रव्य असलेला वाङ्‌मयप्रकार असल्यामुळे कादंबरीतील जीवनचित्रण प्रत्ययकारी होणे आवश्यक असते.

या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनातील राजकारणाचे चित्रण आहे. घोडेगावातील दलित लोकांवर पाटलाचा दबाव आहे. घोडेगावातील दलित लोकांवर जे लोक अन्याय करतात त्यांना पाटील आपलेसे करून घेतो. स्वत:च्या स्वार्थासाठी प्रसिध्दीच्या मागे लागलेले लोक या कादंबरीत आहेत. गावातील राजकारणाने सामान्य लोकांचे जीवन अशक्य झाले आहे. राजकीय आणि सामाजिक परिस्थितीने निर्माण केलेले हेवेदावे, जातीभेद, संघर्ष या गोष्टींचे चित्रण या कादंबरीत आहे.

सदाशिवरावांनी व नानासाहेबांनी ब्रिटिशांच्या गोळ्या अंगावर झेलून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांना वाटत होते की, आज नाही उदया खेडयातील जीवनामध्ये परिवर्तन होईल. या आशेने ते जखमा जोजवित जीवन जगत आहेत. या कादंबरीतील पाटील, शिरढोणकर हे राजकारणी आहेत. ते प्रसिध्दी मिळावी म्हणून सतत

प्रयत्न करताना दिसतात.

घोडेगावातील राजकारण हे सामान्य जीवन जगणा-या दलित व सवर्ण यांच्यामध्ये संघर्ष घडवून आणते. हीन राजकारणामुळे गरिबीत जीवन जगणारे कुटुंब हीन अवस्थेला कसे पोहचते हे ही येथे दिसते. हरिभाऊ पगारेंच्या कुटुंबातील मुलीचा काही दोष नसतानाही तिला पळवून नेले जाते. राजकारणातील निवडणुकीमुळे गावात सतत संघर्ष चालू असतो. पण गढीमध्ये ऐषआरामात राहणारे पाटील गावातील दलित-सवर्ण संघर्षाकडे लक्ष देत नाहीत. या सर्व गोष्टींचे चित्रण नागनाथ कोत्तापल्ले यांच्या या कादंबरीत दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण समाजात क्रांतिकारक बदल घडून आले. खेड्यांचा शहरांशी संबंध आला व राजकीय, सामाजिक क्रिया प्रतिक्रियामुळे ग्रामीण जनतेच्या दृष्टिकोणात बदल घडून आला. एका बाजूने वैज्ञानिक साधने खेड्यांपर्यंत पोहचली, तर दुस-या बाजूला गावे आपल्या रूढी, परंपरा व लोकसंस्कृतीच्या बंधनात जखडलेली होती. स्वातंत्र्यप्राप्ती, नवीन राज्य घटना, विविध योजना यामुळे खेड्यातून राजकारणाला प्रेरणा मिळाली. पण या राजकारणाने अनेक कुटुंबेही उद्ध्वस्त केली. लोक स्वार्थी बनू लागले. खेड्यात संघर्ष, ताण-तणाव, हेवेदावे, जातिभेद निर्माण झाले. हे मोडून काढण्यासाठी व सर्व कुठं तरी संपले पाहिजे या उद्देशाने एक तरूण समाजकार्यकर्ता घोडेगावात येतो. पण त्यालाही हे लोक पटवून घेत नाहीत किंवा गावातील परिस्थिती समजून न सांगता त्याचीच टवाळी करतात. असे या कादंबरीतील घोडेगाव संघर्षाने सतत पेटत होते. पण स्वार्थी, राजकारणी लोक त्याकडे लक्ष न देता " स्ट्रगल फंड " मिळवण्यासाठी तेवढे धडपडत होते आणि समाजपरिवर्तन केल्याचा टेंभा मिरवत होते. सत्तेसाठी व पैशासाठी हपापलेले लोक या गावामध्ये खूप होते. गावावर आपला प्रभाव असणारा हा पाटील भरभक्कम जुन्या-पुराण्या गढीमध्ये ऐषआरामात राहत असतो. आणि येणा-या अधिकाऱ्याला सर्व व्यवस्थित आहे असे सांगून परत

पाठवतो. असा हा पाटील कुणाचाही विचार न करणारा माणूस आहे. तो समाजाच्या जुन्या परंपरागत मनोवृत्तीचे प्रतीक आहे.

अशाप्रकारे बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारी एक चांगली कादंबरी म्हणून " उलट चालिला प्रवाहो " या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो.

## संदर्भ-टीपा

१. चंदनशिव, भास्कर — " प्रतिष्ठान "
( कादंबरी समीक्षा विशेषांक )
जानेवारी १९९१, पृ. क्र. १४१

२. ठाकूर, र. ना. — " मराठी ग्रामीण कादंबरी "
मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे,
पहिली आवृत्ती, १९९३, पृ. क्र. १३२.